अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे

तुळजाराम चतुरचंद महाविदयालय,बारामती

M.A.I (सेमिस्टर २ )

# इतिहास

C.P. 4202 मध्ययुगीन भारतातील संस्था आणि संकल्पनांचा विकास

# Question Bank

**बहूपर्यायी प्रश्न –**

१. भारतात इतिहास लेखनाची परंपरा कोणी सुरू केली?

अ – इंग्रज ब – शक

क – चीनी प्रवासी ड – मुस्लीम

२. 'तारिख–ए–फिरोजशाही' हा ग्रंथ कोणी लिहिला?

अ – हसन निजामी ब – झियाउद्दीन बरणी

क – मिन्हाज–उस–शिराज ड – यापैकी नाही

३. सुलतानशाहीमधील कोणत्या घराण्यातील सुलतानाने स्वत:चे आत्मचरित्र लिहिले?

अ – गुलाम ब – खिलजी

क – सययद ड – तुघलक

४. आमिर खुस्त्रोने लिहिलेल्या 'तारीख–ए–अलइ'ग्रंथात कोणत्या सुलतानाच्या राजकीय आर्थिक आणि प्रशासकीय कारकिर्दीचा आढावा घेतलेला आहे?

अ – महंमद–बीन–तुघलक ब – बल्बन

क – अल्लाउद्दीन खिलजी ड – फिरोजशहा तुघलक

५. मोगल बादशहा बाबराने स्वत:चे आत्मचरित्र कोणत्या भाषेत लिहिले आहे?

अ – फारसी ब – चगताई तुर्की

क – उर्दू ड – हिंदी

६. गुलबदन बेगम ने 'हुमायुननामा' हा ग्रंथ कोणच्या सांगण्यावरून लिहिला?

अ – बाबर ब – हुमायुन

क – अकबर ड – जहांगीर

७. 'बादशहा अकबर हा ढोंगी,अप्रमाणिक,इस्लामचा शत्रू,अमीर–उल्–मोमनिन हे श्रेष्ठ पद भूषविण्यास अपात्र व्यक्ती' अशा शब्दात अकबरावर टीका कोणत्या इतिहासकाराने केली आहे?

अ – निझामुद्दीन अहमद    ब – अबूल फझल

क – बदाउनी    ड – यापैकी नाही

८. मोगल बादशहा औरंगजेबाच्या कोणत्या समकालिन इतिहासकाराने मराठयांची महाराणी ताराबाईचे कौतूक केले आहे?

अ – साकी मुस्तैदखान    ब – ईश्वरदास नागर

क – भिमसेन सक्सेना    ड – यापैंकी नाही

९. विजापूरच्या आदिलशाहीवर लिहीलेला 'मुहम्मदनामा'हा ग्रंथ कोणी लिहीला?

अ – जहर    ब – मुहम्मद नुस्रत

क – फितूरखान    ड – यापैंकी नाही

१०. मोगल बादशहा अकबराच्या दरबारातील इतिहासकार अबू फजलची हत्या कोणी केली?

अ – बिरबल    ब – मुराद

क – सलीम    ड – यापैंकी नाही

११. फाराबीने राज्यशास्त्रावर किती ग्रंथ लिहले?

अ – दोन    ब – पाच

क – सात    ड – तीन

१२. 'लौकिक स्वरूपाच्या राज्यव्यव्हाराच्या योग्य व्यवस्थेचे विवेचन करणारे शास्त्र'–अशी राज्यशस्त्राची व्याख्या कोणत्या विचारवंताने केली आहे?

अ – फाराबी    ब – विज्ञानेश्वर

क – शुक्राचार्य    ड – घझाली

१३. रामचंद्रपंत अमात्य लिखीत 'अज्ञापत्र' केंव्हा अधिकृतरित्या जाहिर करण्यात आले?

अ – १७१५    ब – १७१४

क – १७१६    ड – १७००

१४. मोगल साम्राज्याचा संस्थापक बाबराने कोणत्या विजयानंतर 'पादशहा' हे बिरूद धारण केले?

अ – सिंध विजय | ब – पानीपत
क – आग्रा | ड – अफगाणिस्तान

१५. मोगल साम्राज्याचा पंतप्रधान कोणत्या नावाने ओळखला जातो?

अ – वजीर–ए–आझम | ब – मीर बक्षी
क – सद–ए–जहान | ड – यापैंकी नाही

१६. प्रशासनभवनाच्या बाबतीत अकबराचा पूर्वसूरी म्हणून कोणाला ओळखले जाते?

अ – अल्लाउद्दीन खिल्जी | ब – बाबर
क – शेरशहा | ड – हुमायून

१७. प्रशासनाच्या सोयीसाठी मोगल बादशहा अकबराने आपले साम्राज्य किती विभागात विभागले होत?

अ – २२ | ब – १५
क – १६ | ड – १२

१८. मोगल साम्राज्यातील कोणत्या बादशहाने 'मनसबदारी' पध्दतीची सुरूवात केली?

अ – जहांगीर | ब – औरंगजेब
क – शहाजहान | ड – अकबर

१९. 'मनसब' हा शब्द कोणत्या भाषेतील आहे?

अ – फारसी | ब – उूर्दू
क – अरबी | ड – यापैंकी नाही

२०. 'जे राजे आणि उमराव उलेमांच्या घरी जातात ते सर्वात श्रेष्ठ आणि जे उलेमा राजा व उमराव यांच्या घरी जातात ते सर्वात कनिष्ठ असतात'.

असे कोणत्या ग्रंथात म्हणटले आहे.

अ – तारिख–ए–फिरोजशाही | ब – तारिख–ए–अलइ
क – तारिख–ए–फकरूद्दीन मुबारकशाह | ड – यापैंकी नाही

२१. 'छ. शिवाजीने किल्ले प्रशासनामध्ये तीन जातींच्या अधिका-याची केलेली नेमणूक, एकमेकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी नसून एका राष्टीय ध्येयासाठी त्यांना एकत्रित आणण्यासाठी योजलेला एक कुशल आणि चतुर उपाय होता'

वरील मत कोणत्या इतिहासकाराने मांडले आहे.

अ – वि.का.राजवाडे　　　　ब – सेतूमाधवराव पगडी

क – ग्रॅड डफ　　　　ड – जदूनाथ सरकार

२२. भारतात किती सुफी पंथ होते?

अ – पाच　　　　ब – सात

क – सहा　　　　ड – चार

२३. मोगलकालिन कोणती जमिन महसूल पध्दत 'बटाई पध्दत' या नावाने ओळखली जात असे.

अ – गल्ला–बक्षी पध्दत　　　　ब – कानकुट पध्दत

क – नसक पध्दत　　　　ड – हस्त–ओ–बुद

२४. मराठा साम्रज्यातील कोणत्या राज्यकत्याने जमिन महसूल 'लिलाव पध्दतीचा' स्विकार केला.

अ – माधराव पेशवा　　　　ब – बाजीराव पेशवा

क – सवाई माधराव पेशवा　　　　ड – नारायणराव पेशवा

२५. कागदाचा शोध कोणत्या देशात सर्वात प्रथम लागला.

अ – चीन　　　　ब – इराण

क – इटली　　　　ड – यापैंकी नाही

२६ बहामणी राज्याची स्थापना करणा-या 'हसन गंगू'चे मुळ नाव कोणते होते?

अ – हसन निजामी　　　　ब – बहामन हसन शाह

क – अल्लाउद्दीन हसन　　　　ड – यापैंकी नाही

२७. निकोलो कोन्ती या इटालियन प्रवाशाने विजयनगरला केंव्हा भेट दिली.

अ – १४१५　　　　ब – १४२०

क – १४१८　　　　ड – १४२५

२८. दिल्ली सुलतानशाहीमधील कोणत्या सुलतानाने 'दिवान–इ–कोही'या नवीन खात्याची स्थापना केली.

अ – फिरोजशहा तुघलक | ब – महंमद–बीन–तुघलक

क – अल्लाउद्दीन खिलजी | ड – बल्बन

२९. महाराष्टातील भक्ती संप्रदायांपैकी एक असणा-या महानुभाव संप्रदाय मागे पडण्याचे कोणते कारण होते.

अ – महानुभाव संप्रदायाने जाती संस्थेचा केलेला स्विकार.

ब – कृष्ण भक्तीचा अतिरेक

क – वर्णाश्रम संस्थेचा व वेदातील शिकवणूकीचा केलेला अस्विकार.

ड – यापैंकी नाही

३०. महाराष्टातील वारकरी संप्रदायाची सुरवात कोणत्या संताने केली?

अ – संत नामदेव | ब – संत एकनाथ

क – संत ज्ञानेश्वर | ड – संत सोपानदेव

३१. संत कबिरांना दीक्षा कोणी दिली?

अ – रामानंद | ब – सूरदास

क – धरमदास | ड – नंददास

३२. 'बंगालची मलमल इतकी तलम असे की, जर शंभर हात लांबीचा अशा मलमलीचा तुकडा एखादया माणसाच्या डोक्याभोवती गुंडाळला तरी त्याचे केस त्या कपडयाच्या घडीतूनसुध्दा दिसू शकत असत.'

वरील वर्णन कोणी आहे.

अ – अबूल फजल | ब – हसन निजामी

क – झियाउद्दीन बरनी | ड – यापैंकी नाही

३४. अब्दुल रझाक याच्या मते कोणत्या दरबारातील उमराव मानेवर रत्नजडित पाचू,हिरे, माणिके व मोती बसविलेल्या सोन्याच्या गळपट्टया वापरत असत.

अ – विजयनगर | ब – बहामणी

क – पांडय | ड – चेर

३५. विजयनगरच्या साम्राज्यामध्ये अफू कोणत्या देशातून आयात केली जात असे.

अ – सिलोन ब – चीन

क – पोर्तुगाल ड – यापैंकी नाही

३६. दिल्ली सुलतानशाही मध्ये 'कर्जाउ रकमा देणारे' व 'पेढीवाले' कोणत्या नावाने ओळ ओळखले जात.

अ – सावकार व शेटे ब – साहू व महाजन

क – महाजन व सावकार ड – साहू व शेटे

३७. मोगलकालिन कोणत्या हुंडीची रक्कम हुंडीमध्ये लिहिलेल्या तारखेपासून काही ठराविक दिवसांनंतर दयावी लागत असे.

अ – दर्शनी हुंडी ब – शहाजोग हुंडी

क – जोखमी हुंडी ड – मिती हुंडी

## एका वाक्यात उत्तरे –

१. भारतातील मध्ययुगाचा कालखंड सांगा.

२. फारसी साधनातील 'मसनवी' म्हणजे काय?

३. मध्ययुग – संकल्पना

४. 'देवल रानी खिज्रखान' ही मसनवी कोणी लिहिली?

५. 'अखबरात' म्हणजे काय?

६. 'तुझुक – ए – बाबरी' या स्वतःच्या आत्मचरित्रात बाबराने स्वतःच्या किती वर्षांचा आढावा घेतला आहे?

७. भीमसेन सक्सेना ने कोणत्या मोगल बादशाहाच्या कारकिर्दी बद्‌दल लिखाण केले आहे?

८. संस्कृत व इतर भारतीय भाषांना आश्रय देणारा पहिला मोगल बादशाहा कोण होता?

९. फतेहपूर सिक्री व आग्रा या ठिकाणांना भेट देणारा पहिला इंग्रज – व्यापारी कोण होता?

१०. 'फुतुहात – ए – फिरोजशाही' हा ग्रंथ कोणी लिहिला?

११. मध्ययुगीन विचारवंत फाराबी ने कोणत्या विषयांवर ग्रंथ लेखन केले आहे?

१२. मध्ययुगातील कोणत्या विचारवंताने 'सेंद्रीय राज्य सिध्दांत' मांडला?

१३. मध्ययुगीन विचारवंत शुक्राचार्य यांच्या मते राज्याला किती अवयव असतात?

१४. 'व्यक्तीचा सामाजिक दर्जा जन्मावरून ठरत नसून तिच्या गुणावरून व कार्यावरून

ठरतो.’

वरील मत कोणत्या विचारवंताने मांडले आहे?

१५. ‘राजा कालस्य कारणम्’ म्हणजे काय?

१६. मध्ययुगीन विचारवंत रामचंद्रपंत आमात्यांच्या मते – साहुकार म्हणजे कोण?

१७. विजयनगर राज्याच्या राजधानीचे शहर ‘विजयनगर’ कोणत्या नदीच्या काठी व कोणत्या राज्यकर्त्याने वसविले?

१८. बहामणी राज्याची मृत्यू – घंटा म्हणून कोणाच्या हत्तेचा उल्लेख केला जातो?

१९. ‘इस्लामच्या प्रेषिताने धर्मसत्ताक राज्याची स्थापना केली’ – हे मत कोणत्या इतिहास लेखकाने मांडलेले आहे?

२०. दिल्ली सुलतानशाहीमध्ये संरक्षण खाते कोण पाहत असे?

२१. दिल्ली सुलतानशाहीतील ‘कोतवालांचे’ कार्ये कोणती होती?

२२. मध्ययुगीन भारतातील बंजारा समाजाचे कार्ये कोणते होते?

२३. मोगलकालखंडातील ‘मनसबदार’ पध्दतीतील दोन श्रेण्या कोणत्या होत्या?

२४. ‘हिंदूस्थानात ब्राम्हण हे सर्वात जास्त प्रामाणिक आणि सन्मानित लोक आहेत. त्यांच्या सल्ला आणि संमतीशिवाय राजा काही करीत नाही.’

विजयनगरच्या राज्यकर्त्यांबाबत वरील मत कोणत्या पाश्चात्य विचारवंताने मांडले आहे?

२५. सुफी संप्रदायातील लोकांच्या उदरनिर्वाहाची दोन साधने कोणती होती?

२६. संत तुळशीदास लिखित ‘रामचरित मानस’ बाबत – ‘इंग्लंडमध्ये बायबलला जेवढी लोकप्रियता या ग्रंथाला गंगानदीच्या तटावरील सबंध प्रदेशात लाभलेली आहे.’

वरील मत कोणत्या पाश्चात्य विचारवंताने मांडले आहे?

२७. ऐने – अकबरी या ग्रंथाच्या मते – झब्त पध्दती कोणत्या राज्यकर्त्यांच्या काळात भारतात अमलात आाणली गेली?

२८. दिल्ली सुलतानशाहीमध्ये साखरेच्या उत्पादनासाठी कोणती शहरे प्रसिध्द होती?

२९. मोगलकालीन भारतातील किती प्रकारचा होता?

३०. मोगलकालखंडातील कोणत्या बादशहाने शेठ फत्तेचंद याला ‘जगतशेठ’ ही पदवी बहाल केली?

Short Notes –

१. अलबेरूनी
२. अमीर शुस्त्रो
३. अबुल फजल
४. मध्ययुग
५. फराबी
६. घझाली
७. आज्ञापत्र
८. कृष्णदेवराय
९. राजेंद्र चोल
१०. उलेमा
११. मोगलकालिन वैश्य वर्ग
१२. वैष्णव पंथ
१३. महाराष्ट धर्म
१४. सिलसिला
१५. मुईनुद्दीन चिस्ती
१६. दिल्ली सुलतानशाहीकालिन – कापड उदयोग
१७. मोगलकालिन साखर उदयोग
१८. विजयनगरकालिन – धातुकाम
१९. अल्लाउद्दीनच्या आर्थिक योजना
२०. बंजारा
२१. वजीर
२२. सुभेदार
२३. मोगलकालिन हुंडीचे प्रकार
२४. गल्ला – बक्षी पध्दत

## Short Question –

१. दिल्ली सुलतानशाही इतिहास लेखनाचा आढावा घ्या.

२. ‘मध्ययुगाकडे संक्रमण’ या संज्ञेचा अर्थ स्पष्ट करून विवेचन करा.

३. मध्ययुगीन भारतीय लेखनाच्या अभ्यासासाठी उपयुक्त असणा-या परकिय प्रवासी वृतांतचे महत्त्व सांगा.

४. मराठा इतिहास लेखनातील रामचंद्रपंत आमात्यांच्या आज्ञापत्राचे महत्त्व स्पष्ट करा.

५. शुक्राचार्य यांचे राज्य व राजपद या विषयी विचार स्पष्ट करा.

६. दिल्ली सुलतानशाहीतील प्रांतिक प्रशासनाचा आढावा घ्या.

८. भारतातील सुफी संप्रादयाचा आढावा घ्या.

९. राजनितीवरील घझालीचे विचार सविस्तर स्पष्ट करा.

१०. शुक्राचार्याचा सेंद्रिय सिद्धांत स्पष्ट करा.

११. महाराष्ट्रामध्ये निमार्ण झालेल्या वारकरी संप्रादयाचा सविस्तर आढावा घ्या.

१२. महाराष्ट्रामध्ये वारकरी संप्रादयातील संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम यांचे योगदान स्पष्ट करा.

१३. मोगलकालीन जमिन महसूल पद्धतीचा सविस्तर आढावा घ्या.

१४. विजयनगर साम्राज्यातील चलन पद्धतीचा सविस्तर आढावा घ्या.

१५. मराठाकालीन पेठी–प्रकाराची माहिती लिहा.

## Long Questions –

१. राज्य व राजपद या विषयी अबूल फजलचे विचार स्पष्ट करा.

२. मोगलकालिन प्रशासकीय व्यवस्थेची चर्चा करा.

३. मोगलकालिन समाजजीवनाचा आढावा घ्या.

४. भारतीय समाजावरील सुफी तत्वज्ञानाच्या प्रभावाची चर्चा करा.

५. २१व्या शतकातील भारतीय समाजव्यस्थेचा आढावा घ्या.

६. छ.शिवाजीने निर्माण केलेल्या ‘स्वराज्या’तील वारकरी संप्रदायाचे योगदान स्पष्ट करा.

७. मोगलकालिन चलन व्यवस्थेची ठळक वैशिष्टये सांगून त्याची चर्चा करा.

८. अकबरकालिन ‘मनसबदारी’ पद्धतीचा सविस्तर आढावा घ्या.

९. अकबराचे धार्मिक धोरण – सध्याच्या काळात कितपत उपयुक्त आहे?तुमचे मत सविस्तर स्पष्ट करा.

१०. तुम्ही वाचलेल्या शिवाजी महाराजांवरील कोणत्याही एका पुस्तकाचे परिक्षण करा.